# प्रेस नोट दि. ११/१०/२०१९

**सोलापूर तालुका पोलीस स्टेशन हददीतील मुळेगाव तांडा परिसरात अवैद्य रित्या चालु असलेल्या १८ ठिकाणावर हातभट्टी दारू तयार करणाऱ्या १८ इसमाविरूध्द् गुन्हे दाखल करून सुमारे २८,०५,९००/- रू. मुददेमाल नष्ट करण्यात आले आहे.**

--००--

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाणेकडून मोठया प्रमाणावर अवैध व्यवसायावर कारवाईचे सत्र सुरु दि. ११/१०/२०१९ रोजी मा. पोलीस अधीक्षक सो, मा. अपर पोलीस अधीक्षक सो, व उप विभागीय पोलीस अधीकारी सो, यांच्या नेतृत्वामध्ये सोलापूर तालुका पोलीस स्टेशनच्या हददीत मुळेगाव तांडा गवाच्या शिवारात हातभटटी दारूच्या भटटयावर कार्यवाही करण्याच्या उददेशाने संयुक्त पणे मोहिम राबवण्यात आली होती. सदर मोहिमे मध्ये वन विभाग,एम.एस.ई.बी विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग व सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

कार्यवाही दरम्यान मुळेगाव तांडा परिसरात एकुण १८ ठिकाणी छापे टाकुण १८ आरोपी विरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले असुन २८,०५,९००/- किमतीचा मुददेमाल नष्ट करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी ही मा. मनोज पाटील पोलीस अधीक्षक सो, यांच्या मार्गदर्शनामध्ये श्री. अतुल झेंडे अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, श्री. प्रभाकर शिंदे उप विभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे नेतृत्वामध्ये सोलापूर तालुका पोलीस ठाणेकडील श्री. सुहास जगताप, सहा.पो.नि देवडे, सहा. पो.नि. आवटे, म.सहा.पो.नि तावरे, पो.स.ई/दळवी, पो. स.ई पिगुंवाले, सोलापूर तालुका पोलीस स्टेशन तसेच स्थानिक गुन्हे शाखा कडील कर्मचारी, तसेच इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर कारवाईत भाग घेतला.

प्रति,

मा. संपादक,

नमुद बातमी आपले लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होणेस विनंती आहे.